डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/ २६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बार्टी/योजना/२०२५-२६/१८१६ दिनांक:-२०/०३/२०२६

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रतीक्षा यादीतील पात्र उमेदवारांसाठी दिनांक २३ मार्च, २०२६ पासून संघ लोकसेवा आयोग- नागरी सेवा- महाराष्ट्र, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) – राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, अराजपत्रित गट "ब" व "क" तसेच कर्मचारी निवड आयोग- वर्ग ३ या परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करणेबाबत विद्यार्थ्यांकरिता सर्वसाधारण सूचना**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ३०.१०.२०२३ च्या शासन निर्णयानुसार शासनाच्या सर्वंकष धोरणांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग- नागरी सेवा, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, न्यायिक सेवा, अराजपत्रित गट "ब" व "क" व कर्मचारी निवड आयोग- वर्ग ३ या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम योजना राबविण्यात येत आहे.

याअनुषंगाने दिनांक १५/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रतीक्षा यादीतील Confirmation Slip प्राप्त विद्यार्थ्यांचे **दिनांक १२/०३/२०२६, १३/०३/२०२६, १६/०३/२०२६,१७/०३/२०२६ व दिनांक १८/०३/२०२६** रोजी बार्टी, मुख्यालयात कागदपत्रे तपासणी करण्यात आलेली आहे.

प्रतीक्षा यादीतील Confirmation Slip प्राप्त व **कागदपत्रे तपासणी झालेल्या विद्यार्थ्यांचे दिनांक २३ मार्च, २०२६** पासून संघ लोकसेवा आयोग- नागरी सेवा- महाराष्ट्र , महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) राज्यसेवा, अभियांत्रिकी सेवा, अराजपत्रित गट "ब" व "क" व कर्मचारी निवड आयोग- वर्ग ३ या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी सदर प्रशिक्षणाच्या अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे.

## विद्यार्थ्यांकरिता सदर प्रशिक्षणाबाबत सूचना खालीलप्रमाणे

१. बार्टी, पुणे मार्फत कागदपत्रे तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ पासून प्रशिक्षण सुरु करण्यात येणार असून ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप कागदपत्रे तपासणी केलेली नाही त्यांनी बार्टी, पुणे येथे उपस्थित राहून कागदपत्रे तपासणी करून घेणे बंधनकारक आहे. प्रशिक्षण केंद्रात जाऊन कागदपत्रे तपासणी केलेल्या विद्यार्थ्यांना निवड अंतिम ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
२. बार्टी, पुणे यांनी निर्धारित केलेल्या विहीत कालावधीमध्ये प्रशिक्षणाचा लाभ घेणे विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे.
३. सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यावर निर्धारित केलेल्या महिन्याचा प्रशिक्षण कार्यक्रम पुर्ण करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षण कालावधी दरम्यान अर्धवट प्रशिक्षण सोडता येणार नाही.
४. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान कुठेही शासकीय/ निमशासकीय/खाजगी नोकरी करता येणार नाही. तसे आढळल्यास किंवा याबाबत या कार्यालयास काही तक्रार प्राप्त झाल्यास विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल व नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

५. विद्यार्थ्याने कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर केलेले अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र, इतर सर्व आवश्यक कागदपत्रे व सादर केलेली माहिती यामध्ये काही खोटे/तफावत आढळल्यास संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल, तसेच दरम्यानच्या काळात घेललेले सर्व लाभ परत करावे लागतील.

६. प्रशिक्षण योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रशिक्षण सोडायचे असल्यास घेतलले सर्व लाभ, दरम्यानच्या काळात प्रशिक्षण योजनेकरीता झालेला सर्व खर्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) संस्थेला परत करावा लागेल. तसे न केल्यास कायदेशीर आणि दंडात्मक कार्यवाही केली जाईल.

७. विद्यार्थ्याने यापुर्वी बार्टी मार्फत राबविलेल्या **UPSC (वर्ग-१) प्रशिक्षणाचा लाभ घेतला असल्यास अशा विद्यार्थ्यांची UPSC- Civil Services, MPSC-State Service, MES, JMFC, Group “B” and “C”, IBPS, SSC-class III करिताची निवड रद्द करण्यात आली आहे याबाबत** पुन्हा लाभ घेता येणार नाही. याबाबत लाभ घेतल्याचे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द होईल तसेच दरम्यानच्या काळात घेतलेले सर्व लाभ परत करावे लागतील.

८. प्रशिक्षण योजनेच्या कालावधी दरम्यान विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन होणार नाही. प्रशिक्षण संस्थेतील सर्व नियमांचे व शिस्तीचे पालन करावे लागेल. तसेच प्रशिक्षण कालावधीमध्ये धुम्रपान/अंमली पदार्थांचे सेवन, मद्यपान, उद्धट वर्तन असे कोणतेही गैर प्रकार केल्यास संबंधित उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल व कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

९. सदर प्रशिक्षण योजने अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना विद्यावेतनाचा लाभ मिळण्यासाठी किमान **७५% उपस्थिती असणे बंधनकारक राहील.** प्रशिक्षण संस्थेकडून प्रशिक्षण काळात दर महिन्याचे बायोमेट्रिक उपस्थिती पत्रक डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेस प्राप्त झाल्यावर त्याची पडताळणी करून थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे विद्यार्थ्यांनी दिलेल्या बँक खात्यावर विद्यावेतनाची रक्कम जमा केली जाईल. प्रत्येक महिन्याची बायोमेट्रिक उपस्थिती किमान ७५% न भरल्यास त्या महिन्याच्या विद्यावेतनास विद्यार्थी अपात्र ठरविण्यात येईल.

१०. विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण संस्थेमार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व सराव चाचण्यास (टेस्ट सिरीज) उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

११. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने काही अडी अडचणी (अभ्यासक्रम अपूर्ण किंवा इतर) असल्यास विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे येथील योजना विभागाशी संपर्क साधावा.

१२. शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या आरक्षणानुसार लाभार्थी संख्येच्या प्रमाणात महिला, दिव्यांग, अनाथ व वंचित घटक उमेदवारांकरीता जागा आरक्षित ठेवल्या आहेत.

१३. प्रशिक्षण योजनेकरीता निवड झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणासाठी तात्काळ रुजू होणे आवश्यक आहे. जर दिलेल्या तारखेपासून ०७ दिवसाच्या आत विद्यार्थी पसंती दिलेल्या प्रशिक्षण संस्थेत रूजू झाला नाही तर त्या जागी प्रतीक्षा यादीतील उमेदवाराची निवड करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१४. सदर स्पर्धा प्रशिक्षण कार्यक्रम ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत असुन विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेणे बंधनकारक आहे. ऑनलाईन स्वरुपात प्रशिक्षण राबविण्यात येत नाहीत. याबाबत विद्यार्थी व प्रशिक्षण संस्थेबाबत तक्रार प्राप्त झाली तर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१५. योजनेबाबत सर्व अटी व शर्ती बाबत विद्यार्थ्यांनी प्रतिज्ञापत्र सादर करणे अनिवार्य/बंधनकारक आहे.

१६. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती http://barti.maharashtra.gov.in संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तसेच योजना बद्दल नवीन माहिती जाणून घेण्यासाठी उमेदवारांनी वेळोवेळी उपरोक्त नमूद संकेतस्थळाला भेट देऊन माहिती घ्यावी.

स्वाक्षरी.

(दिपा मुधोळ –मुंडे)

**महासंचालक**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था, बार्टी,पुणे**